# सरकत्या जिन्यावर ताशी ७३०० प्रवासी

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो ३ या भूमिगत मेट्रो स्थानकांत प्रवेश करण्यासाठीच्या सरकत्या जिन्यांची क्षमता ताशी ७,३०० प्रवाशांची असेल. हे जिने स्टेनलेस स्टीलवर काचेचे आवरण असलेल्या कठड्यांनी सज्ज केले जात आहेत.

मेट्रो ३ ही राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडते. उत्तरेकडे सारिपूतनगर (आरे) ते दक्षिणेकडे कफ परेड, अशी मार्गिका आहे. या मार्गिकेचा आरे ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय) हा पहिला टप्पा यावर्षी डिसेंबर; तर बीकेसी दक्षिण ते कफ परेड, हा दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ मध्ये सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर या मार्गिकांवरील स्थानकांचीही झपाट्याने उभारणी होत आहे. त्यामध्येच सरकते जिने महत्त्वाचे ठरणार आहेत.

- भूमिगत मेट्रोच्या बीकेसी स्थानकाला सर्वाधिक जिने
- स्टील व काचेचे आवरण असलेले जिने सेन्सरने सज्ज



ही मार्गिका उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशननुसार, हे अत्याधुनिक व सेन्सरने सज्ज असेल सरकते जिने असतील. जिन्यांच्या कंपनांवर विशेष चमू पूर्णवेळ लक्ष ठेवेल. त्याचवेळी संपूर्ण जिन्यावर काहीही अडकले, तरी जिने स्वयंचलितरित्या तत्काळ थांबतील. अशा जिन्यांनी सज्ज असलेले पहिले स्थानक एमआयडीसी आहे. याखेरीज मरोळ, विद्यानगरी, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल १ व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे असे जिने बसविण्याचे काम प्रगतिपथावर आहे. प्रत्येक स्थानकात असे किमान दोन, मोठ्या स्थानकात दुप्पट व बीकेसी स्थानकात असे सर्वाधिक जिने बसविले जात आहेत.